# ALTERNATIVE ACADEMIC PLAN 2021-22

STD: 5th MEDIUM : MARATHI SUBJECT : MARATHI (FL) MONTH : OCTOBER

| अ.न. | महिना/ आठवडा | घटकाचे नाव | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|---|
| 7 | ऑक्टोबर | वीर हुतात्मा नारायण (10 तास ) | **1.** देशभक्तीची भावना विद्यार्थ्यांमध्ये जागृत करणे. | • DSERT प्रकाशित यू-ट्यूबवरील संवेद -इ पाठाचे निरीक्षण करा.<br><br>**कृती:7.1** विद्यार्थ्यांना माहिती असलेल्या किंवा शाळेतील वर्ग खोल्यांमध्ये असलेल्या देशभक्तांचे फोटो पाहून त्यांच्या नावाची यादी प्रत्येक विद्यार्थ्याला तयार करण्यास सांगणे सर्व विद्यार्थ्यांना वर्गात एकत्र करून प्रत्येकाकडून लिहिलेली नावे वाचण्यास सांगणे. | देशभक्तांचे फोटो व नावे . ओड्या जुळवा . |
| | | | | कृती:7.2 पाठाच्याअध्यापननंतर विद्यार्थ्यांना वीर हुतात्मा नारायण याच्याबद्दल आठ ते दहा ओळीत माहिती लिहिण्यास सांगून प्रत्येकाकडून वाचन करून घेणे. | |
| | | | | **कृती:**5.3 देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या शूरवीरांचे तसेच समाज सुधारकांचे फोटो जमा करून विद्यार्थ्यांकडून अल्बम तयार करून घेणे.<br><br>**https://www.youtube.com/watch?v=ej7hWvryTXk** | तयार केलेली कृती जमा करावी. |

# ALTERNATIVE ACADEMIC PLAN 2021-22

STD: 5th MEDIUM : MARATHI SUBJECT : MARATHI (FL) MONTH : OCTOBER

| अ.न. | महिना/ आठवडा | घटकाचे नाव | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **कृती:7.4** देशभक्ती आणि गायनाची आवड निर्माण होण्याकरिता विद्यार्थ्यांच्यात देशभक्ती गीत गायनाची स्पर्धा आयोजन करून जे जे विद्यार्थी चांगले गातात त्यांचे कौतुक करून अभिनंदन करणे व देशप्रेम जोपासण्यासंबंधी मार्गदर्शन करणे. | विद्यार्थ्यांचे ऑडिओ , विडिओ |
| | | | **2.** पाठातील दिलेला परिच्छेदाचा(पॅरेग्राफ)अर्थ ग्रहण करून काही शब्दांचा अर्थ व छोट्या छोट्या प्रश्नांची उत्तरे देणे. | **कृती:7.5** पाठातील दिलेला परिच्छेद वाचत असताना अर्थ न समजलेले शब्द वहीवर लिहून शिक्षकांकडून अर्थ समजून घेऊन वहीत लिहिणे व त्याच परिच्छेदवर विद्यार्थ्याने स्वतःच्या भाषेत साध्य होतात इतके छोटे छोटे प्रश्न तयार करणे. सर्व विद्यार्थ्यांकडून त्यांनी दिलेल्या शब्दांचा अर्थ व तयार केलेले प्रश्न व त्यावर त्या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांच्यात चर्चा घडवून आणणे. | लाईव्ह वर्कशीट /,सर्वेहर्ट /,गुगलफॉर्म/ व्हॉट्सॲप यांचा वापर करू शकता. |
| | | | व्याकरण इयत्ता पाचवी | **कृती:7.6** विद्यार्थ्यांना कार्डशिट चे फ्लॅश कार्ड बनविण्यासाठी तुकडे देऊन पाठातील दोन दोन ओळी प्रत्येकाला देऊन त्यातील जोड शब्द फ्लॅश कार्ड वर लिहिण्यास सांगणे. | |

# ALTERNATIVE ACADEMIC PLAN 2021-22

STD: 5th MEDIUM : MARATHI SUBJECT : MARATHI (FL) MONTH : OCTOBER

| अ.न. | महिना/ आठवडा | घटकाचे नाव | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कृती:7.7 पाठावरील नवीन शब्दांचे अर्थ वहीत लिहून समजावुन घेण्यास सांगणे. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या जोड्या करणे वहीत न बघता एकमेकाला शब्दांचे अर्थ विचारून बरोबर असल्यास बरोबर चूक असल्यास चूक हे विद्यार्थ्यांनी मान्य करून तपासणी करणे. | लाईव्ह वर्कशीट /,सर्वेहर्ट /,गुगलफॉर्म/ व्हॉट्सअॅप यांचा वापर करू शकता. |
| 8 | ऑक्टोबर | आपला मित्र साप (11 तास ) | **1.** लेखनात चिन्हांची गरज ओळखून त्यांचा योग्य ठिकाणी योग्य वापर करणे. **[https://www.youtube.com/watch?v=cBZHfEYMcQQ](https://www.youtube.com/watch?v=cBZHfEYMcQQ)** **[https://www.youtube.com/watch?v=KGWtJkFIdpM](https://www.youtube.com/watch?v=KGWtJkFIdpM)** | कृती:8.1 विरामचिन्हांची माहिती विद्यार्थ्यांना कितपत आहे हे पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना वर्गात विराम चिन्हाचे फ्लॅश कार्ड तयार करून, प्रत्येक मुलाने पाळीपाळीने एक एक फ्लॅश कार्ड उचलून त्यातील विराम चिन्ह पाहून त्याचे नाव सांगणे. हातात पुस्तक घेऊन ते विराम चिन्ह सदर पाठात कुठे कुठे आहे त्या पाठातील ओळी वाचून सांगणे. जेणेकरून मुलांना विराम चिन्हाच्या वापराबद्दल कल्पना येईल.<br>• DSERT प्रकाशित यू-ट्यूबवरील संवेद -इ पाठाचे निरीक्षण करा. | लाईव्ह वर्कशीट /,सर्वेहर्ट /,गुगलफॉर्म/ व्हॉट्सअॅप यांचा वापर करू शकता. |

# ALTERNATIVE ACADEMIC PLAN 2021-22

STD: 5th MEDIUM : MARATHI SUBJECT : MARATHI (FL) MONTH : OCTOBER

| अ.न. | महिना/ आठवडा | घटकाचे नाव | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|---|
| | | | विरामचिन्हांचा वापर | **कृती8.2** विद्यार्थ्यांचे पाच गट करून सदर पाठात किती पूर्णविराम किती स्वल्पविराम,किती प्रश्नचिन्ह तसेच किती उद्गारवाचक चिन्ह **आहेत.** त्याप्रमाणे गटवार त्या पाठातील चिन्हांची संख्या मोजणे सांगून खातरजमा करणे. | |
| | | | 2. वेगवेगळ्या सापांविषयी माहिती जाणून घेणे.  | **कृती:8.3** विद्यार्थ्यांच्यात चर्चा करून अनेक जातीचे साप व त्यांची नावे लिहिण्यास सांगणे. गावात कधीतरी एखादा साप पकडला असल्यास त्यावर चर्चा करणे. <br><br> https://www.youtube.com/watch?v=nFSLvQGQjB8 | योजना कार्य |

# ALTERNATIVE ACADEMIC PLAN 2021-22

STD: 5th    MEDIUM : MARATHI    SUBJECT : MARATHI (FL)    MONTH : OCTOBER

| अ.न. | महिना/ आठवडा | घटकाचे नाव | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **कृती:8.4** गावातील एखाद्या सर्पमित्राला शाळेत बोलावून सर्व विद्यार्थ्यांचे समोर त्यांच्याशी सापा◌ंबद्दलची माहिती व साप आपला मित्र कसा, सापापासून शेतकऱ्याला काय फायदा होतो, सापांच्या अनेक प्रकारच्या जाती, सापांचे जीवन इत्यादी सविस्तरपणे मुलांना चर्चा करण्यास प्रोत्साहन देणे. | सापाबद्दलची माहिती पेपरवर लिहून घेणे . |
| | | |  | **कृती:8.5** नाग सापाचे चित्र काढून ते रंगून त्याच्याखाली आठ ते दहा ओळी माहिती लिहिण्यास सांगणे | चित्र जमा करणे . |
| | | | 3. एक वचन अनेक वचन ओळखणे. पाठातील नवीन शब्द, विरुद्ध अर्थाचे शब्द लिहिणे. | | लाईव्ह वर्कशीट /,सर्वेहर्ट /,गुगलफॉर्म/ व्हॉट्सअॅप यांचा वापर करा . |

# ALTERNATIVE ACADEMIC PLAN 2021-22

STD: 5th MEDIUM : MARATHI SUBJECT : MARATHI (FL) MONTH : OCTOBER

| अ.न. | महिना/ आठवडा | घटकाचे नाव | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **कृती:8.6** विद्यार्थ्यांना वर्गात गोल बसून शिक्षकाने मधोमध बसावे. दहा एक वचन असलेले शब्द सांगून त्यांचे अनेक वचनात रूपांतर करण्यास विद्यार्थ्यांना सांगणे. अनेक वचनाचे एक वचनात रूपांतर करण्यास सांगणे. मुलाना चर्चेत सामावून घेणे.   <br>https://www.youtube.com/watch?v=lwcdTDIgvFg <br>पाठयपुस्तकातील पृष्ठ क्र. 35 वरील जोड्या जुळवा , रिकाम्या जागा भरा या कृती लाईव्ह वर्कशीट /,सर्वेहर्ट /,गुगलफॉर्म यांच्या सहाय्याने करून घ्याव्या | जोड्या जुळवा , ड्रग अँड ड्रॉप ही कृती द्यावी . |

# ALTERNATIVE ACADEMIC PLAN 2021-22

STD: 5th MEDIUM : MARATHI SUBJECT : MARATHI (FL) MONTH : OCTOBER

| अ.न. | महिना/ आठवडा | घटकाचे नाव | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|---|
| 9 | ऑक्टोबर | जादूगर (6 तास ) | **1.** कविता वाचून अर्थ ग्रहण करून कोठे/ का /कसे / अशा प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत देता येणे.  | • DSERT प्रकाशित यू-ट्यूबवरील संवेद -इ पाठाचे निरीक्षण करा.<br><br>**कृती:9.1** कवितेचे विषयांतर केल्यानंतर विद्यार्थ्यांनाच कोठे /का/ कसे/ कधी अशा प्रश्नांची उत्तरे मिळविण्यास विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य देऊन बोलके करून चर्चेत सर्वांनी सहभाग घेण्यास प्रेरित करणे व प्रत्येक विद्यार्थ्यासबोलण्याची संधी देणे.   | बहुपर्यायी प्रश्न लाईव्ह वर्कशीट /,सर्वेहर्ट /,गुगलफॉर्म/ व्हॉट्सॲप यांचा वापर करू शकता. |
| | | |  |  **कृती:9.2** वेगवेगळी निसर्ग चित्रे रेखाटून त्यांच्यात रंग भरणे. उदा. 1. उगवणारा सूर्य. 2. मावळणारा सूर्य. 3. इंद्रधनुष्य . 4. समुद्रकिनाऱ्यावरील नारळांची झाड. 5. वाहणारी नदी अथवा धबधबा. | सर्व चित्रे फाइल मध्ये जमा करावी . |

# ALTERNATIVE ACADEMIC PLAN 2021-22

STD: 5th MEDIUM : MARATHI SUBJECT : MARATHI (FL) MONTH : OCTOBER

| अ.न. | महिना/ आठवडा | घटकाचे नाव | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **कृती:9.3** पावसाची गाणी, मोराचे गाणे हावभाव युक्त म्हणून दाखवणे.<br><br>https://www.youtube.com/watch?v=imUUogeGUio | ऑडिओ /विडिओ |
| | | | | **कृती:9.4** कवितेतील सारांश समजून घेतल्यानंतर निसर्गात ऋतुमानानुसार होणारे बदल जादू हे विद्यार्थ्यांना आपल्या भाषेत लिहिण्यास सांगून वाचन करून घेणे.प्रसंगानुसार विद्यार्थ्यांना शाळेच्या बाहेर निसर्गात नेऊन निसर्गातील चमत्कार दाखवणे.<br>उदा. 1.सायंकाळच्या वेळी आकाशात दिसणारे रंगीत वेगवेगळ्या आकाराचे ढग.<br>2. वेगवेगळ्या वनस्पतीच्या पानांचा आकार फुलांचा आकार, रंग ,वास.<br>3. परिसरातील पक्षी, त्यांच्या आकार त्यांचा रंग, त्यांचे आवाज, त्यांचे निवासस्थान. | मूल्यमापनासाठी लाईव्ह वर्कशीट /,सर्वेहर्ट /,गुगलफॉर्म/ व्हॉट्सॲप यांचा वापर करू शकता. |
| | | | 2. कवितेतील लयबद्ध शब्द आणि नवीन शब्द समजून घेणे | **कृती:9.5** कवितेत असलेले लयबद्ध शब्दांचे गट करून लिहिणे.<br>उदा. रंग--अंग , नक्षी--पक्षी , मोका--झोका. | |
| | | | | **कृती:9.6** कवितेतील नवीन शब्दांचे अर्थ लिहून पाठांतर करणे. तसेच काही शब्दांचे समानार्थी शब्द लिहिणे<br>उदा. मेघ,तरू, जल , नभ , सागर. | |

# ALTERNATIVE ACADEMIC PLAN 2021-22

STD: 5th MEDIUM : MARATHI SUBJECT : MARATHI (FL) MONTH : OCTOBER

| अ.न. | महिना/ आठवडा | घटकाचे नाव | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|---|